<u>अत्यंत महत्वाचे</u>

जा.क्र.शिउसं/प्रशि-४/सूचनापत्र /पुवि/१२-१३/ २६१०२
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक- 24 DEC 2012

प्रति,

संस्था सचिव/अध्यक्ष
सर्व अनु./विनाअनु/ कायम विनाअनु अध्यापक विद्यालये,
पुणे विभाग.

विषय - अध्यापक विदयालयाचे प्राचार्य/प्रभारी प्राचार्य/संच मान्यता
सन १२-१३ प्रस्तावा बाबत

उपरोक्त विषयासं अनुसरुन कळविण्यात येते की, ज्या अध्यापक विदयालयांचे नियमित प्राचार्य / प्रभारी प्राचार्य **मान्यता प्रस्ताव** दाखल केले आहेत त्या प्रस्तावा मध्ये ब-याच त्रुटी पुढील प्रमाणे आढळून आलेल्या आहेत.

१. **<u>गुणपत्रक व प्रमाणपत्रे</u>** – प्राचार्य / प्र.प्राचार्य मान्यता प्रस्तावा सोबत शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेची गुणपत्रके व प्रमाणपत्रे सादर केलीजात नाहीत. ज्या अध्यापक विदयालयांनी सादर केली आहेत ते साक्षांकित करुन सादर केलेले आढळून आले नाहीत.

२. **<u>रोष्टर -</u>** संस्थेने रोष्टर संबंधीचे केवळ एकच अध्यापक विदयालय असल्या बाबतचे हमीपत्र जोडलेले नाही. एका पेक्षा जास्त अध्यापक विदयालये असल्यास रोष्टरची प्रत जोडलेली दिसून येत नाही.

३. **<u>मान्यता प्रत व अनुभव प्रमाणपत्रे-</u>** प्राचार्य पदी नियुकत केलेले कर्मचा-याचे मान्यता प्रती व अनुभव दाखले जोडलेले नाही अथवा अनुभव दाखल्यामध्ये कार्यरत कालावधी संपूर्ण नोंद केलेला दिसून येत नाही.. मान्यतेची परिपूर्ण प्रत सादर केल्याचे दिसून येत नाही. प्रस्तावातील प्रती साक्षांकित केल्याचे आढळून येत नाही

४. **<u>हमीपत्र</u>** – प्रभारी प्राचार्य नियुक्ती साठी संस्थेचे रु.१०० च्या बॉड पेपर वर हमीपत्र सादर केलेले आढळून येत नाही.

**संच मान्यता** प्रस्ताव ज्या अध्यापक विदयालयांनी सादर केले आहेत त्यांनी सन १२-१३ साठी माध्यम निहाय ,तुकडी निहाय प्रथम व द्वितीय वर्षातील प्रवेश संख्या बाबत प्राचार्याचे स्वाक्षरीने पुढील तक्त्यात माहिती सादर करावी. व तदनंतर **<u>संच मान्यता आदेश उपलब्ध करुन घ्यावेत.</u>**

**प्रपत्र अ- विदयार्थी संख्या अहवाल सन १२-१३ .**

| अ.क्र. | अध्यापक विदयालयाचे नांव | माध्यम | तुकडीचा प्रकार अनु/ विना/ कायम विना अनु | तुकडी संख्या | प्रवेश क्षमता | सन १२-१३ प्रथम वर्ष प्रवेश संख्या | सन १२-१३ द्वितीय वर्ष प्रवेश संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| एकुण | | | | | | | |

**प्रपत्र ब – कार्यरत पदे व रिक्त पदाचा तपशील -**

| अ.क्र. | अध्यापक विदयालयाचे नांव | पदाचे नांव | सन ११-१२ मधील संच मान्यतेनुसार मंजूर पद वेतनश्रेणी /एकत्रित वेतनावर | सन ११-१२ मधील मंजूर पद संख्या | सन १२-१३ मध्ये कार्यरत पद संख्या | रिक्त पद संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| एकुण | | | | | | | |

ज्या अध्यापक विदयालयांनी अदयापी संच मान्यता प्रस्ताव दाखल केले नाहीत त्यांनी ते **दि.२६/१२/१२ ते ३०/१२/१२** अखेर परिपूर्ण प्रस्ताव दाखल करावेत **<u>दि.३१/१२/१२ नंतर अध्यापक विदयालयाचे संच मान्यता प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. व त्या बाबतची जबाबदारी प्राचार्य / संस्थाप्रमुखांची राहील याचीही नोंद घ्यावी.</u>**

24/12

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १.